# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि. ३१.०१.२०२३

**आलोसे संतोष परशराम राठोड वय ५५ वर्षे, तलाठी, साजा- येवती, कार्यालय रिसोड जि.वाशिम यांनी १०००/- रुपये ची लाच मागणी बाबत.**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | **संतोष परशराम राठोड वय ५५ वर्षे, तलाठी, येवती कार्यालय रिसोड जि. वाशिम** |
| लाचेची रक्कम | १०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे शेतातीतल बोर ची नोंद सातबारावर करुन व त्याचा पक्का फेरफार देणेकरीता. |
| सापळा अधिकारी | एम. एम. अफुने<br>पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

दि. ०७.०१.२०२३ रोजी यातील तक्रारदार पुरुष वय २८ वर्ष व्यवसाय शेती यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे शेतातील बोर ची नोंद सातबारावर घेणेकरीता व पक्का फेरफार देणेकरीता आरोपी लोकसेवक संतोष परशराम राठोड वय ५५ वर्ष तलाठी साजा-येवती यांनी तक्रारदारास १०००/-रुपये लाचेची मागणी केली आहे. सदर तक्रारीवरुन पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे यांनी १०००/-रु लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

सदर कारवाई मा.पोलीस अधीक्षक, श्री.मारोती जगताप, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, पोलीस उप अधीक्षक, श्री.जि.व्ही.शेळके, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक एम. एम. अफुने, अंमलदार पोहेकॉ आसिफ शेख, पोना उज्वल देशमुख, व चापोकॉ नाविद शेख यांनी केली.

कोणत्याही लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकीय कामासाठी लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम, दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३, टोल फ्रि.नं.१०६४ यावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

(एम. एम. अफुने)
**पोलीस निरीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.**